## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०६/२०१८

**१) सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी : –**

दिनांक २८/०६/२०१८ चे १०.०० ते २९/०६/२०१८ ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तसेच फिर्यादीचे घरापासुन लांब एकाच गावात राहणारे किसन नामाजी, देशमुख वय ५५ वर्ष व केवळरामजी देशमुख वय ५७ वर्ष यांचे राहत्या घराचे रात्रीच्या वेळी कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे मागच्या दाराचा आतल्या बाजुचा कोंढा तोडुन घरामध्ये प्रवेश करून घरात ठेवलेले लोखंडी कपाटामधुन एक नथ वनज ५ ग्रॅम, १ अंगठी वजन ६ ग्रॅम, १ मच्छली वनज ७ ग्रॅम ,कानातील २ जोड झुमके वनज ६ ग्रॅम ,कानातील साखडया वनज ६ ग्रॅम, नाकातील ३ नग खडे वनज १ ग्रॅम, असा एकुण ९२,०००/रु. चा माल तसेच किसन नामाजी देशमुख वय ५५ वर्षे यांचे घरातील मागच्या दाराचा आतल्या बाजुचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारीत ठेवलेल्या सोन्याचे २ बदाम छाप अंगठी वनज १० ग्रॅम, १ अंगठी खडयाची वनज ५ ग्रॅम , १ सरदयाची नथ वनज ६ ग्रॅम जिवती १ ग्रॅम व नगदी १०,०००/रु असा एकुण ५४,०००/रु. चा माल व केवळ नामाजी देशमुख यांचे घराचे मागच्या दाराचा आतल्या बाजुचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून लोखंडी आलमारीत ठेवलेले १ पुणेसाई नथ वनज ३ ग्रॅम,मनी वनज १ ग्रॅम व नगदी ७०००/रु असा एकुण १५,०००/रु चा माल, तिन्ही मिळुन एकुण १,६१,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी प्रभु हरीजी कुरंजेकर वय ४२ वर्ष रा. भागडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गावंडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) गौ वंस जनावराची कत्तल करून अवैधरित्या बिना परवाना मिळुन आल्याने व जनावरांना कृरतेची वागणुक दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे १४.३०ते १५.५० वाजता दरम्यान यातील आरोपीने गौ. वंश जनावराची कत्तल करून अवैधरित्या बिना परवाना मिळुन आल्याने त्याचे पासुन १ पांढ–या रंगाचे बो–यात १४ किलो गौ मांस, १ लाकडी कुंदा, १ लोखंडी सुरी, १ काळया रंगाचा जिवंत बैल व १ पाढ–या रंगाचा जिवंत बैल असा एकुण ५,५००/रु. चा माल मिळुन आला व बैलांना आखुड दोराने बांधुन कृरतेने वागणुक देतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. चेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भादवी. सहकलम ५,५(क),९,९(अ)म.प्रा.सं.अधी. १९७६ (सन २०१५ चा अधनीयम क्र. ५ अन्वये सुधारीत नुसार) सहकलम ११(च)प्रा.कृ.वा.प्र. अधीनीयम १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) लोखंडी बादलीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २९/०६/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांचे शेत एकमेकाला लागुन असुन यातील आरोपी ही फिर्यादीचे शेत बांधीतुन गेली असता, फिर्यादीने तिला काही न बोलता 'तुम्ही दुस–यांदा आमचे बांधीतुन जावु नका तिथे तुरी लावले आहेत धु–याने जा' अशी बोलली असता, यातील आरोपीने फिर्यादीला तु मलाच बोलली म्हणुन फिर्यादीचे बोलने स्वत:ला लावुन घेवुन रस्त्याचे कारणा वरून तिचे सोबत भांडण शिवीगाळ करून विहीरीतील पाणी काढण्याचे लोखंडी बादलीने तिचे डोक्यावर मारून जखमी केले व तुझ्यानी जे बनते करून घे असे म्हणुन धमकी दिल्याने फिर्यादी सौ. अल्का परमानंद मेश्राम वय ४१ वर्ष रा. रेवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) निष्काळजीपणे वाहन चालवुन पायी जाणा–या इसमास धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २८/०६/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील पोलीस स्टेशन भंडारा मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्रा वरून पोलीस स्टेशन ला नंबरी मर्ग क्र. ०४/२०१८ कलम १७४ जाफौ. चा दाखल करून यातील मृतक दौलत दागु लाडे वय ५५ वर्ष रा. नरसींहटोला हा पायी जात असतांना यातील अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निषकाळजीपणे चालवुन मृतकास धडक मारून गंभिर जखमी केले त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे नेले असता, मरण पावल्याचे तेथील डॉ. ने घोषीत केले, त्यास आरोपीने कोणत्याही प्रकारची वैदयकीय मदत न करता पळुन गेल्याने व मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने मर्गचे कागदपत्रा वरून व फिर्यादी भाऊराव जयपाल लाडे वय ३५ वर्ष रा. नरसींहटोला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी.सहकलम १८४,१३४ (अ),(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोयंडे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**५) जळुन उपचारा दरम्यान चिमुकलीचा मृत्यु : –**

दिंनाक २५/०६/२०१८ चे १८.०६ वाजता दरम्यान यातील मृतक कु. तनु दुर्योधन तुमडाम वय ८ महिने रा. चिखली ही तिचे घरी ५० टक्के जळाल्याने तिला औषधोपचारा करीता ग्र. रू. अडयाळ येथे भरती केले असता, एमओ सा. अडयाळ यांनी पुढील उपचाराकरीता सा.रू. भंडारा येथे रेफर केल्याने तिला सा.रू. भंडारा येथे वार्ड क्र. १९ मध्ये भरती केले असता, उपचारा दरम्यान दि. २५/०६/२०१८ चे १८.०६ वाजता मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग. क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाद्वारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुठील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**६) विषारी औषधी प्राशन करून उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु : –**

दिंनाक २६/०६/२०१८ चे १७.१० वाजता दरम्यान यातील मृतक अतुल सिध्दार्थ रामटेके वय २८ वर्ष रा. चुल्हाड याने दि. २६/०६/२०१८ ला विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग. क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाद्वारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. बोरकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुठील तपास पो.ना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) इसमाचा मृत्यु : –**

दिंनाक २८/०६/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील मृतक दौलत जागु लाडे वय ५५ वर्ष रा. नरसींह टोला हा रोडने पायी जात असतांना त्यास अज्ञात वाहनाने धडक मारून अपघात करून पळुन गेल्याने मृतकास औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग. क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. नंदेश्वर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम १७४ अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुठील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०६/२०१८ चे १६.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅझीक वाहन ही भिलेवाडा टोल नाका येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुरले पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक २९/०६/२०१८ चे १५.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅझीक वाहन ही तहसील चौक लाखनी येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. टेभुर्णे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**ब)** दिनांक २९/०६/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर ऑटो वाहन ही बसस्टॉप चौक लाखनी येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनी.आडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चव्हाण पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**क)** दिनांक २९/०६/२०१८ चे १८.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन ही बसस्टॉप चौक लाखनी येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी मपोउपनी.आडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चव्हाण पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०६/२०१८ चे १९.१५ ते १९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महीद्रा मॅक्स वाहन हे नविन बसस्टॉप चौक तुतसर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भुते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भुते पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २९/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा पिकप वाहन हे दांडेगाव फाटा रा. क्र. २७२ येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. पुराम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी करीत आहेत.

**.१२) अवैध हातभट्टी/देशी दारू अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २९/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, व पालांदुर येथे अवैध ातभट्टी/देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ लिटर हातभट्टी कंमती८००/रु. तसेच ०८ लिटर ६४० मिलीलीटर देशी दारू किमती २,४००/रु. असा एकुण किंमती ३,२००/रु चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २९/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण **११७** प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १७ ईतर वाहनांवरती – १०० केसेस करण्यात आले आहे.

(सपोनी एच. एम रायपुरे)

**पोलीस नियत्रंण कक्ष अधीकारी भंडारा**

**दुरध्वनी.क्र.९९७०७३२०७९**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.